# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०६/०५/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ०६/०५/२००४ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. ३०/०४/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ५) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ८) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ९) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| १०) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ११) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १२) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| १३) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १४) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १५) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

**(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)**

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १ चे वाचन केले.)**

**मिलन म्हात्रे :-**

२२/१/२००४ च्या इतिवृत्तांत पान क्र. २ मध्ये ठराव क्र. १९० यामध्ये २४/१२/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरूस्त्यांसह हे इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे, असे आपण दरवेळेला म्हणतो. म्हणजे सदस्यांनी ज्या सूचना सूचविल्या आहेत त्याची नोंद कुठेच काही नाही आहे.

**प्र. सचिव :-**

आपण आता हे जे इतिवृत्तांत मंजूर करू त्यात त्या सूचना घेण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला थोडेच आठवणार आहे की, वर्षभरामध्ये आम्ही काय सूचना सूचविल्या आहेत. त्या सूचना आल्या पाहिजेत. त्याची तुम्ही येथे नोंद करा की, ह्या ह्या सदस्यांनी अशी सूचना सूचवली आहे व त्याच्यासह हा ठराव मंजूर. कारण आता हे आपल्याजवळ अंतिम मंजूरीसाठी आले आहे. अंतिम मंजूरी ही दुरूस्त्यांसह झाली पाहिजे. तसेच पान क्र. ३ मध्ये दुकानाच्या ठेकेदाराने मॅनेज केलेले आहे. तर त्या दुकानांच्या हे अनेकवचनी आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, हे जे आता येथे आले आहे. त्यात अजित पाटील ह्यांनी लिहीले आहे की, ॲक्च्युअली बोर्डाप्रमाणे बिलाची आकारणी करू. तर त्याप्रमाणे आकारणी आकरण्यास सुरूवात केली आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपायुक्त सो.) :-**

वसुली केलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

वसुली जुनी झाली. पण नविन बोर्ड मापणी करून आकारणी करणार आहात तर ह्या वर्षी चालू केली आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपायुक्त सो.) :-**

नविन आकारणी चालू केली आहे.

**संजय दोंदे :-**

नाही, अजून नविन आकारणी चालू केली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ८ मध्ये वरून अकरावी लाईन यामध्ये तुम्हाला ह्या केस फेस होउ शकतात त्याच्यामध्ये डिटेक्ट लिहिले आहे. माझा शब्द डिडेक्ट आहे म्हणजे आढळू शकतात. फेस होणे आणि डिटेक्ट होणे ह्यात बराच फरक आहे. पान क्र. ९ मध्ये माझ्या वक्तव्यामध्ये हा संपूर्ण हा जो कॉलम आहे. यामध्ये वक्तव्य असे होते की, त्यामध्ये काही रिडक्शन करायचे आहे का? काही सजेशन वगैरे ज्या होत्या तर त्या सजेशन ज्या आम्ही केल्या त्याच्यामध्ये निकाल लागले की, आपण एक फॉम बनवू, त्याच्यामध्ये कॉन्टर स्लीप करू, व्यापाऱ्यांची त्याच्यामध्ये हरकत नाहरकत आपण तिथेच घेऊ म्हणजे लिटीकेशन राहणार नाही. तर तो निर्णय, सजेशन झालेले आहे त्याचे ह्याच्यामध्ये कुठेही वक्तव्य नाही आहे. सभेमध्ये आम्ही बोललो आणि त्याच्यावर आयुक्त साहेबांचा निकाल झाला की, ते करण्यात येईल. पण ते येथे काहीच दिलेले नाही. उपआयुक्त साहेब ह्यांचे जे काही स्टेटमेंट होत्या. तसे पुढेपण एक झाले आहे त्यावेळेला शिवमुर्ती नाईक साहेब होते त्यावेळेला आपण सजेशन सांगितले की, एक फॉर्म बनवा त्याच्यात कॉन्टर स्लीप तयार करा व त्याच्यावर त्या दुकानदाराची सही घ्या व त्या सहीला जर त्या दुकानदाराचे ऑब्जेक्शन असेल तर तिकडेच त्यांना सांगा की हरकत आहे. त्यावेळेला असे सांगितले होते की, फॉमचा फॉरमेट तयार करण्यात येईल. पान क्र. ११ मध्ये वरती त्या डिपार्टमेंटबद्दल मी विचारले होते की हया संपूर्ण डिपार्टमेंटमध्ये कोण अधिकारी नेमलेला आहे. त्याला त्याच्या कॅबिनवर म्हणा किंवा त्याला जो पदभार व जिथे तो अधिकारी बसतो तिथे कुठेही असे नाही आहे की जसे आपण केळकर साहेबांना जकात अधिकारी म्हणून चार्ज दिला आहे त्याचे जे डेसीग्नेशन आपण देतोय ते अधिकारी कोण? आणि जर नेमला असेल तर तिथे पदभार लावायला सांगा म्हणजे आम्हाला कळेलच की हया अधिकाऱ्याजवळ हा चार्ज आहे. जो कोण अधिकारी नेमलेला असेल त्याच्यापुढे पदभार लावा आम्हाला वाद नाही आहे डिपार्टमेंट व त्यांच्या खाली जे कोण अधिकारी असतील त्याच्या टेबलावर पदभार लावायला सांगा. कारण हया सभेमध्ये ठरले होते की अधिकारी आम्ही नक्की करणार व त्यांना त्यांच्या पदभार देणार पण तो अजून दिला गेलेला नाही. हया गोष्टीला आता तीन ते चार महिने झाले. पान. क्र. १६ मध्ये हया ज्या पाटया उदघाटनाच्या आपण बनवणार आहेत तर त्यावेळेला असे ठरले होते की त्या पाटयांचा फॉरमॅट आपण सिटी इंजिनीअर हयांच्याकडून नक्की करणार आणि समिती समितीसमोर त्याची मंजूरी घेणार म्हणजे पुढे वाद नको.

**प्र. सचिव :-**

ठराव चालेल का?

**मिलन म्हात्रे :-**

त्यात सुधारण करावी लागेल. सभापती साहेब आता आपल्या निरनिराळया कमिटी बनवणार. व आपण वार्ड समितीला मान्यता दिली आहे समजा एखादया ठिकाणी एखादे उदघाटन असेल तर तुमच्या ठरावात त्या वार्ड समितीच्या चेअरमनचा उल्लेख नाही आहे. महिला बाल कल्याण समिती वृक्ष प्राधिकरण समिती आहे.

**याकुब कुरेशी :-**

आपल्याला आता येथे इतिवृत्तांताला मंजूरी दयायची आहे का ठराव करायचे आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव नाही आहे.

**याकुब कुरेशी :-**

आपण इतिवृत्तांताला मंजूरी देत आहोत तुम्हाला जे काही कळवायचे सांगायचे असेल तर आपण ते नंतर कळवा. सभापती साहेब येथे प्रोसिडिंगला मंजूरी दयायचे चालले आहे तर आपण प्रोसिडिंगच्या हिशोबाने सांगा त्या इतिवृत्तांताला मध्ये जी काही चूकी असेल ती आपण सुचवा.

**मिलन म्हात्रे :-**

हयाच्यामध्ये जे झाले आहे त्याचे आपण पुढच्या इतिवृत्तांतात नोंद केली पाहिजे. हे माझे सजेशन आहे. साहेब पुढे हयाच्यामुळे वाद होतात. आपण आता ही प्रोसिडिंग फायनल करतोय. साहेब माझी सुचना आहे आता ज्या वॉर्ड समित्या स्थापन झाल्या व उद्या वॉर्ड समितीचे हे सभापती साहेब हया ठरावानुसार आपण मान्यता देणार त्याच्यामध्ये त्यांचे नाव नसणार ते म्हणतोय मी आता आपण जी सुधारणा करतोय ते विचार करुन आपण केले पाहिजे.

**आसिफ शेख :-**

त्यामध्ये सांगितले आहे ती दुरूस्ती करुन घ्या . कारण आपल्यापुढे हे जे इतिवृत्तांत झाले आहे त्याला दुरुस्तीसह मान्यता दयायची आहे तर दुरुस्तीसह मान्यता देताना प्रभाग समित्या आपण नेमणार आहेत तर प्रभाग समिती व त्याचे अध्यक्ष असतील त्यांचे नाव आले पाहिजे मागच्या नगरपरिषदेच्या काळात काय झाले की जेंव्हा उदघाटनाची पाटी लागत होती तेव्हा सन्मा. सभापती आणि स्थायी समिती सदस्य त्यामध्ये होते. तेंव्हा चर्चा झाली होती. समिती सदस्य त्यामध्ये होते. तेव्हा चर्चा झाली होती. स्थायी समिती सदस्य ही त्यामध्ये राहतील हे दुरुस्त करुन घ्या.

**कल्याण केळकर (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब हयांच्या संमतीने बोलतो असे झाले पाहिजे की मा. महापौर महोदयांचे नाव असायला पाहिजे उपमहापौर हयांचे नाव असायला पाहिजे स्थायी समिती सभापती हयांचे नाव असायला पाहिजे स्थायी समिती सभापती हयांचे नाव असायला पाहिजे सभागृह नेता हयांचे नांव असायला पाहिजे. त्या प्रभागातील तीन किंवा चार नगरसेवकांची नावे असायला पाहिजे आयुक्त साहेबांचे नाव असायला पाहिजे आणि म्हात्रे साहेबांनी त्यावेळेला सूचित केले होते की त्या भागातला प्रभाग समितीचा अध्यक्ष जो असेल त्याचे नाव पाहिजे

**मिलन म्हात्रे :-**

प्रभाग समिती ज्या बनतील त्या.

**कल्याण केळकर (मा. उपायुक्त सो.) :-**

प्रभाग समितीचे अध्यक्ष त्यांच नांव हयामध्ये नाही आहे ते ॲड करु.

**मिलन म्हात्रे :-**

आता हयांनी जी हरकत काढली आपण जी अठराव्या पानावर जी लिस्ट दिली आहे त्यामध्ये प्रभाग समितीवर स्थानिक नगरसेवकांचा उल्लेखच नाही आहे.

**कल्याण केळकर (मा. उपायुक्त सो.) :-**

अठरा नंबरवर आहे. फक्त त्याच्यामध्ये प्रभाग समिती अध्यक्षाचे नाव आठमध्ये इन्क्ल्युड करायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रभाग समिती व अन्य समिती असे लिहा . मग त्या जे कोण येतील ते कारण महिला बालकल्याण आहे. वृक्ष संवर्धन समिती आहे.

**कल्याण केळकर (मा. उपायुक्त सो.) :-**

त्या समितीशी संबंधित असतील ते.

**मिलन म्हात्रे :-**

व अन्य समित्या पान क्र. २० मध्ये माझ्या नावापुढे एवढयात विषय वाचून झाला असता असे आले पाहिजे. तो फक्त वाचून झाला आहे असे आहे व झाला असता अशी दुरुस्ती करावी.

**आसिफ शेख :-**

५/१२/२००४ (१) च्या इतिवृत्तांतात पान नं २ मध्ये माझ्या वक्तव्यात गंभीर तक्रार आहे. त्यांनी आमच्या ऐवजी तक्रारदार कडे पैसे मागितले आणि त्यांनी दिले नाही. म्हणून करभरणा केलेला असताना देखील त्या अधिकाऱ्याने व कर्मचाऱ्याने गाळयास जाणूनबुजून सील ठोकले याची चौकशी करा असे आले पाहिजे. आणि त्या चौकशीचे काय झाले? सभापती साहेब आपण आताच्या आत्ता सस्पेन्ड करतो म्हणून सांगितले होते. त्याची चौकशी केली का?

**कल्याण केळकर (मा. उपायुक्त सो.) :-**

याबाबत चौकशी करण्यात यावी.

**याकुब कुरेशी :-**

०५/०२/२००४, २ या इतिवृत्तांत पान क्र. १८ मध्ये माझ्या संभाषणामध्ये हे देखील जोडीला जायला पाहिजे तर जायला हा शब्द वगळण्यात आला आहे ही दुरुस्ती करावी.

**प्रकरण क्र. १ :-**

दि. २२/०१/२००४, दि. ०५/०२/२००४, दि. ०५/०२/२००४ (तहकुब सभा) व दि. ११/०२/२००४ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १ :-**

दि. २२/०१/२००४, दि. ०५/०२/२००४, दि. ०५/०२/२००४ (तहकुब सभा) व दि. ११/०२/२००४ रोजीचे मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सूचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश द. नलावडे. अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २ चे वाचन केले. )

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय एक पत्र दिलेले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल आणि त्याचबरोबर सन्मा. सदस्य शरद पाटील, सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस आणि सन्मा. सदस्य अनंत पाटील यांनी दिलेल्या पत्राचे उत्तर मा. आयुक्त साहेब आज आपणाला लवकरात लवकर देतील. सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल आणि सन्मा. सदस्य शरद पाटील सन्मा. सदस्य जोजेफ घोन्सालवीस आणि सन्मा. सदस्य अनंत पाटील यांनी पत्र सभापतींना लिहून दिले त्यामध्ये त्याचा असा उल्लेख आहे की मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत महापालिका कामकाजाचे प्रकरण २ मधील पोटकलम १ (ड) अनुषंगाने सन. २००४-०५ सालाकारिता जकात कर किंवा उपकर लावण्याच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी खास सभा बोलावण्याबाबत. महोदय आम्ही सहया करणारे मा. स्थायी समितीचे सभासद आपणाकडे अशी मागणी करित आहोत की मिरा भाईंदर महापालिकेतर्फे लावण्यात येणारा जकात कर योग्य ठरेल काय? या विषयासंदर्भात सभागृहाचे मत जाणून घेउन निर्णय घेणे योग्य ठरेल. आपणांस असलेल्या सदरच्या पत्राचे सभागृहासमोर वाचन करण्यात आले.

**मोहन पाटील :-**

असे त्यांनी एक पत्र दिले होते मग ते सन्मा. सदस्य या विषयाला कसे उपस्थित राहिले. ज्या सन्मा. सदस्यांनी हयाच्यावर आक्षेप घेतला नाही की हा विषय महासभेपुढे घ्यावा आणि त्यांचा सन्मा. सदस्यांना आक्षेप आहे. तर आपण सन्मा. सदस्यांनी त्यावेळी उत्तर दयायला पाहिजे होत. उत्तर दिले असते तर निर्णय घेतला असता.

**कल्याण केळकर (मा. उपायुक्त सो.) :-**

आजच मा. आयुक्त साहेबांशी चर्चा झाली आणि सर्व सन्मा. सदस्यांना त्या संबंधीचे उत्तर तयार झालेले आहे आणि आज आपणाला पत्राचे उत्तर मिळणार आहे. कालच संध्याकाळी पत्र प्राप्त झाले.

**मोहन पाटील :-**

पण साहेब, त्यांचा आक्षेप आहे. त्यांनी सांगितले या सभेला विषयच घेऊ नये असे त्यांचे म्हणणे आहे आणि मग ते त्या सभेलाही आलेले आहेत. तर त्यांना आपण उत्तर देणे क्रमप्राप्त हाते. वेळेवर उत्तर देणे क्रमप्राप्त आहे. मग त्यांनी काय तो निर्णय घेतला नंतर विषय संपला.

**कल्याण केळकर (मा. उपायुक्त सो.) :-**

या संबंधीचा महत्वाचा निर्णय म्हणजे पुर्वी जेव्हा जकात कर लावावा अगर न लावावा या संबंधी आपल्या महानगरपालिकेने एक संयुक्त समिती नियुक्त केली होती आणि संयुक्त समितीने अनेक महानगरपालिकांची चर्चा करुन पाहणी करुन एक अहवाल सभागृहामध्ये सबमिट केला होता आणि त्या वेळेसच असा धोरणात्मक निर्णय महासभेने घेतला की, उपकरा ऐवजी जकात कर लावावा असा अगोदर धोरणात्मक निर्णय महासभेने घेतलेला आहे आणि धोरणात्मक निर्णय घेतला असल्यामुळे आपल्याला माहिती असेल की, १६/०५/२००४ रोजी कॉन्ट्रॅक्टरचा ठेका संपुष्टात येणार आहे. करार संपुष्टात येणार आहे आणि तो करार संपुष्टात येत असल्यामुळे विशेषतः लोकसभा निवडणूक असल्यामुळे आचारसंहिता लागू होती. आचारसंहितेच्या दरम्यान ही प्रक्रिया करणे निकडीचे होते. या सर्व बाबी लक्षात घेऊन मा. आयुक्त साहेब यांनी निवडणूक आयोगाकडे पत्रव्यवहार केला आणि पत्रव्यवहार करुन काही कामांना पावसाळ्यापुर्वी करणे आवश्यक आहे किंवा विहित मुदतीत करणे आवश्यक आहे. अशा कामांना मा. आयुक्त साहेब यांनी मंजुरी मिळविली. त्यांना मंजुरी मिळाली आहे आणि त्यानुसार १६/०५/२००४ रोजी पुर्वी या संबंधी कारवाई करावयाची असल्यामुळे आणि नगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नाच्या दृष्टीने महत्वाची बाब असल्यामुळे हा विषय सभागृहाच्या पटलावर पूर्ण प्रक्रिया करुन या संबंधीच्या निविदा मागवून हे प्रकरण स्थायी समितीवर सादर करण्यांत आले. धन्यवाद.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, हा जो निर्णय तुम्ही सांगितला तो धोरणात्मक निर्णय एका वर्षासाठी होता की, पाच वर्षासाठी होता.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेब, आजच्या स्थायी समितीपुढे जो विषय आहे. सन्मा. सदस्यांनी जे पत्र आपणाला दिलेले आहे. एखाद्या स्थायी समितीच्या सभेतील विषय जर स्थगित ठेवायचा असेल तर नियमाप्रमाणे सभापतींना किती दिवस आधी पत्र पोहोचले पाहिजे. काल संध्याकाळी मला वाटते सन्मा. सदस्यांनी तुम्हांला काल पत्र दिलेले आहे. त्यामुळे मला वाटते उपआयुक्त साहेबांनी थोडीशी कल्पना द्यावी की, नियमाप्रमाणे किती दिवस आधी पत्र पोहोचले पाहिजे.

**बी. एम. माळी :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्यांनी हे जे पत्र दिले आहे तर मा. महापौरांना विशेष सभा बोलाविण्याचा अधिकार आहे आणि ते स्थायी समितीच्या सभापतींच्या माहितीसाठी पत्र आहे. हे पत्र वास्तविक विशेष करुन मा. महासभेत हा विषय घेण्याबाबत पत्र आहे व स्थायी समितीमध्ये हा विषय घेऊ नये अशी त्यांना विनंती केली आहे. तर पत्र स्थायी समितीला सभेच्या किती दिवस अगोदर देण्याचे जरुरी आहे. तर ते रास्त आहे. परंतु ते पत्र चुकीचे आहे असे माझे म्हणणे आहे. नियम असे म्हणत नाही. ज्या कारणास्तव सभा लावायला पाहिजे होती. तर ही ''अ'' या नियमाद्वारे मागायला पाहिजे होती आणि ''ड'' मध्ये जो उल्लेख आहे तो मा. महापौरांची जागा रिकामी झाली असती. राजीनामा दिला असेल, पालिका सदस्य असण्याचे बंद झाले असते वगैरे या कारणास्तव ती ''ड'' मध्ये तरतुद आहे आणि एक तर आपण स्थायी समितीमध्ये अंदाजपत्रकास जकातीला मंजुरी

दिलेली आहे व महासभेने त्या अंदाजपत्रकास अंतिम मंजुरी दिलेली आहे आणि परत त्यावर पुन्हा विषय स्थगित होणे योग्य नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मागच्या वर्षी जो धोरणात्मक निर्णय घेतला होता तो एक वर्षासाठी होता की, पाच वर्षासाठी होता तेवढे फक्त सांगा.

(मा. कल्याण केळकर सो. ह्यांनी दि. २४/०२/२००३ रोजीचे ठराव क्र. ५६ चे मा. सभापती साहेब ह्यांच्या परवानगीने सभागृहासमोर वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

नुसता मला ठराव वाचून दाखवा. हे सगळे लांबलचक झाले. उपकर व जकातीबद्दल काय लिहिले आहे ते झाले. त्याच्यानंतर चर्चा झाली होती. पण आपला ठराव काय झाला?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

जकात लागू करायचा ठराव झालेला आहे. याच्यामध्ये वर्ष वगैरे नमूद केलेले नाही. हा जकात वसुलीचा धोरणात्मक निर्णय झाला.

**धनराज अग्रवाल :-**

कुठल्या वर्षासाठी?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

वर्षासाठी नाही. जकात लावावी किंवा उपकर लावावा.

**आसिफ शेख :-**

जेव्हा महापालिकेने सर्वानुमते ठराव पास केला आणि धोरणात्मक निर्णय घेतला की, आपल्याला जकात लावायची आहे. आता कथा कुणाची व्यथा कोणा असेच चालले आहे. एकदा आपण निर्णय घेतला की, जकात लावली आणि ते अंमलात आले आहे. आता तुम्ही व्यथा उपकराची वाचून दाखविता आवयकता नाही.

**धनराज अग्रवाल :-**

तो निर्णय आपण घेतला होता. पण एका वर्षासाठी घेतला होता की, पाच वर्षासाठी घेतला होता.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

याच्यामध्ये वर्ष नमुद केलेली नाहीत.

**मोहन पाटील :-**

धोरणाला वर्ष नसते.

**आसिफ शेख :-**

धोरणाला वर्ष नसते. धोरण घेतले की, फायनल आता पुढे जायचे. घड्याळाचे काटे मागे जात नाहीत.

**अशोक पाटील :-**

आपण चालू आर्थिक वर्षासाठी तो निर्णय घेतलेला होता.

**धनराज अग्रवाल :-**

मिटींगमध्ये असे पण झाले होते की, ऑक्ट्रॉयमध्ये जे ऑक्ट्रॉय वसूल करणार असेल मागच्या वेळेला असे व्यापाऱ्यांना, कारखानदारांना, पब्लिकला असे आढळून आले की, हा माणूस बरोबर जकात कर वसुल करतांना हैराण करतो आणि तसे झालेले आहे. तरी तुम्ही सांगितले होते की, सहा महिन्यानंतर आपण परत विचार करु. सहा महिने जाऊ द्या. पण पुढच्या वर्षात पण तुम्ही विचार करायला हवा होता की, आपण ठेकेदाराला द्यायचे की काय करायचे.

**मा. सभापती :-**

आता हा निर्णय धोरणात्मक झालेला असून तो पुढे असाच पाच वर्षापर्यंत कायम राहणार आहे. त्यासाठी आपल्याला विचार करण्यासाठी सहा महिने दिलेले. उपकर लावायचा किंवा ऑक्ट्रॉय लावायचा. पहिला तुम्हांला ठेकेदार खराब होता तो ठेकेदार गेला. आता दुसऱ्या कुणाला तरी मिळाले असे मी ऐकले आहे. पण मला नांव माहिती नाही. तुम्ही आता नांव घोषित करा कोणाला दिलेले आहे ते.

**आसिफ शेख :-**

नांव दिलेले आहे. सभागृहासमोर संपूर्ण टिपणी सादर केलेली आहे. त्यामध्ये दिले आहे की, कुणाल इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांना दिलेले आहे.

**अनंत पाटील :-**

आपला जकात विषयी चर्चात्मक विषय मिरा भाईंदर शहरामध्ये आहे. व्यापाऱ्यांबद्दल जी काही असलेली नाराजी त्यामुळे जनतेमध्ये असलेली नाराजी लक्षात घेतल्यानंतर आपण प्रत्येक सभासद व्यक्तिशः मनामध्ये म्हणत असाल की, ही जकात आपल्याला हवी की नको. जकातीविषयी लोकांची उग्र अशी प्रतिक्रिया असतांना आपण हा जकातीचा विषयाबाबत नगरपालिकेतर्फे जकात चालू केली तरी आमची हरकत नाही. जकातीला माझा विरोध नाही. पण जकात ही नगरपालिकेमार्फत करा. जर २९ करोड त्याच्याबद्दल वसूल ६७ करोड नगरपालिका वसूल करु शकते. जेणेकरुन जनतेला कुठल्याही तऱ्हेचा त्रास होणार नाही. जकातदाराकडून आपल्याला वेळोवेळी त्याबद्दलच्या तक्रारी होत होत्या आणि लोकांना त्याच्यामध्ये निराशा आहे. म्हणून आमचा त्याला विरोध आहे.

**मा. सभापती :-**

आता इलेक्शन तसेच आचारसंहितामुळे आपल्याला काही करता येऊ शकत नसल्या कारणाने कलेक्टरकडून आयुक्तांना मिळालेले टेन्डर काढून आता टेन्डर दिलेले आहे. आता आपल्याला काहीही करता येत नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

निवडणुक आयोगाचे पत्र आहे. एकतर तुम्ही टेंडर काढा. फक्त तुम्ही टेंडर काढा. त्याला मंजुरी द्या असे नाही.

**मा. सभापती :-**

टेंडर काढले आणि जाहिरसुद्धा झाले.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब, असे आहे की, हा जो ठेका निघाला व याची जी रक्कम होती ती २९ कोटी ७ लाख ९९ हजार ९९९ रूपये एवढी ही २००३-०४ च्या देकाराची रक्कम होती आणि त्यामध्ये १० टक्के वाढ करून आपण पुन्हा हे केले होते आणि ह्यावेळेला आपला जो देकार होता व जे अपेक्षित टेंडर होते ते ३५ कोटी ९८ लाख ७९ हजार ९९८ आणि त्याच्याही वर जाऊन जो मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांनी जो देकार दिलेला आहे तो ३६ कोटी २७ लाखाचा म्हणजे दिलेल्या देकारापेक्षा जास्त रक्कम आहे. त्याच्यामुळे स्थायी समितीला एवढे अधिकार आहेत की ते हा निर्णय घेऊ शकतात आणि आचार सहिंतेच्या काळामध्ये ते झालेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

याचा अर्थ असा की, व्यापाऱ्यांनी आणखी त्याच्यामध्ये वाढीव दिले. म्हणजेच कुठेतरी फिगर चुकतो आहे.

**चंद्रकांत वैती :-**

या संदर्भात सभागृहाच्या सूचना लक्षात घ्याव्या लागतील. कारण आपण आधी ठेका दिला होता.

**मोहन पाटील :-**

३६ कोटीचे हे होते. त्यामुळे २६ लाख जास्त दिले नाहीत. आपली फिगर चुकली नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपली उत्पन्नाची फिगर चुकली ४ कोटी नसून आमच्या हिशोबाने १२ कोटी आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल यांनी पत्रामध्ये काय नमुद केले आहे की, विषय स्थगित ठेवा.

**चंद्रकांत वैती :-**

वाढीचे तसे मुद्दे आपण लेखी सभागृहासमोर सादर करावेत.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, उपआयुक्त साहेब, आम्ही जे आपल्याला पत्र दिलेले आहे त्याच्यावर तुम्ही उत्तर द्या आणि विषयाला सुरूवात करा.

**चंद्रकांत वैती :-**

आयुक्त साहेब याबाबत लेखी पत्र देतील.

**शरद पाटील :-**

लेखी पत्र देतील. मग हा विषय तसाच राहिल का? पत्र उशीरा मिळाल्यानंतर तुम्ही ते स्थगित करू शकत नसाल आणि मा. महासभेला घेऊन जात नसाल तर सांगा ते घेऊन जाता येत नाही. मग इथे निर्णय घ्यावा लागेल.

**मोहन पाटील :-**

मुळात जे पत्र सन्मा. सदस्यांनी दिलेले आहे हे पत्र आपल्या सभेला किंवा नियमाला लागू होते की नाही? तर ह्याचे उत्तर पण तुम्ही आम्हाला द्या. विषय असा आहे की, आपण जे पत्र दिलेले आहे ते पत्र या ठिकाणी लागू होत नाही. आपण दिलेले पत्र आहे ते त्या नियमाने आपण पत्र दिले आहे. तो नियम या ठिकाणी लागू होतच नाही. म्हणजे तो पुढचा विषय येतच नाही.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, आता सल्लागारांनी सांगितले की, हे पत्र दिले हे योग्य आहे. कधीही देऊ शकता. ते बोलले पत्र चुकीचे आहे. जेव्हा सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस ह्यांनी विचारले की, हे किती दिवसाच्या आत द्यायला पाहिजे. तेव्हा मा. माळी साहेबांनी सांगितले की, हे स्थायी समिती सभेच्या एक तास अगोदर जरी दिले तरीसुद्धा ते मान्य आणि तुम्ही नंतर असे बोललात की, पत्रच चुकीचे आहे. पण काय चुकीचे आहे? त्याचे उत्तर तुम्ही आम्हाला द्यायचे होते. आम्ही नाही बोलत नाही.

**आसिफ शेख :-**

मा. सभापती साहेब, मा. आयुक्त साहेबांनी जो विषय या ठिकाणी आणलेला आहे आणि तो विषय रितसर या ठिकाणी आणलेला आहे. मा. आयुक्त साहेबांनी निवडणूक आयोगाची परवानगी मागितलेली होती.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख माझा तो विषय नाही आपण जे पत्र दिलेले आहे ते कायद्यान्वये बरोबर आहे की नाही ते आम्हाला सांगा. जर पत्र चुकीचे असेल व ज्या कायद्यामध्ये (ड) नियम त्यांनी दिलेले आहे. त्या नियमात न बसण्याचा प्रश्न येतोच कुठे आणि त्यांनी ते तसे लिहून द्यायला हवे.

**धनराज अग्रवाल :-**

आम्हाला लिहून द्या.

**मा. सभापती :-**

आजच्या दिवसात उत्तर लेखी देण्यात येईल.

**मोहन पाटील :-**

आपण ज्या नियमात पत्र मागितलेले आहे (ड) या नियमाने पत्र त्यांनी मागितलेले आहे तो नियम बरोबर नाही आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, तुम्ही रुलिंग द्या की, पत्राची दखल घेता येत नाही.

**अशोक पाटील :-**

तुम्ही या पत्रावर रुलिंग द्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

स्थायी समितीच्या चार सदस्यांनी लेखी मागणी केल्यावर महासभा बोलवावी लागते हा नियम त्याच्यात आहे तो नियम आपण बघा.

(मा. कल्याण केळकर सो. यांनी मा. सभापती महोदयांच्या परवानगीने मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे प्रकरण २ चे कलम 'क' आणि 'ड' चे सभागृहासमोर वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

म्हणजे हा नियम महासभेचा आहे. स्थायी समितीचा हा निर्णय नाही आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

स्थायी समितीच्या चार सदस्यांनी मागणी केल्यावर मा. महासभा बोलवायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

पण जेव्हा महापौर उपस्थित नसतील त्यावेळी हा नियम लागू होईल.

**याकुब कुरेशी :-**

केळकर साहेब, आता हा जो नियम तुम्ही वाचून दाखविला हा महासभेचा नियम आहे. स्थायी समितीचा नियम नाही आहे

**जोजफ घोन्सालवीस :-**

हा स्थायी समितीचाच नियम आहे.

**याकुब कुरेशी :-**

तुम्ही महासभेची मागणी करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आम्ही मागणी केली आहे.

**याकुब कुरेशी :-**

पण हे जे पत्र आता दिलेले आहे. हे स्थायी समितीमध्ये योग्य आहे की अयोग्य आहे, या गोष्टीवर निर्णय घ्यायचा आहे.

**धनराज अग्रवाल :-**

हे योग्य आहे की अयोग्य आहे ते आम्हांला सांाग.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेबांनी अयोग्य आहे म्हणून रुलिंग दिली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापतींना रुलिंग देऊ दे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपण सांगा की, पत्राची दखल घेता येत नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल आणि इतर सदस्यांनी जे पत्र दिलेले आहे ते अयोग्य असल्या कारणाने स्थायी समितीसमोर पत्राची दखल घेता येत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. सभापती साहेब, आजचा विषय स्थगित करण्यासाठी ज्या सदस्यांनी आज पत्र दिलेले आहे ते कायद्याने बरोबर आहे का?

**चंद्रकांत वैती :-**

त्या संदर्भात मा. सभापतींनी निर्णय दिलेला आहे. परंतु आता मला वाटते असे म्हणावयाचे आहे की, गेल्या वेळेला सहकार एजन्सीच्या माध्यमातून ज्यावेळेला जकात वसुली केली जाते. त्यावेळेला झालेले प्रकार आणि त्याच्यामुळे सर्व लोकप्रतिनिधींकडे येणाऱ्या तक्रारी याबाबत आपण गेल्या वेळेला जकात ठेकेदाराच्या विरोधात एक सभा स्थायी समिती सभागृहात आयोजित केली होती. त्यावेळेला काही धोरणे, नियम आपण ठरविण्यासाठी चर्चा केली होती. त्याबाबत आपण जकात योग्य मुल्य हे निश्चित करायचे होते. कारण बिले अंडरव्हॅल्यु केली जातात वगैरे अशा तक्रारी असायच्या. तर त्या वस्तूचे व्हॅल्युएशन कोणी करायचे. पुन्हा विविध दुकानांमध्ये, कारखान्यांमध्ये, कार्यालयामध्ये जाऊन त्यांचा दस्तऐवज तपासता येणे, हे दस्तऐवज तपासता येण्याचे अधिकार संबंधित ठेकेदाराला आहेत किंवा नाही. जर असतील तर त्याच्यासोबत महापालिकेचा कुठला अधिकारी गेला पाहिजे. तिथे उपस्थित होणारी जी प्रकरणे आहेत, जे वाद-विवाद आहेत ते सोडविण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याची निवड व्हावी. प्रत्येक जकात नाक्याच्या ठिकाणी आपल्या महापालिकेचा एक अधिकारी / कर्मचारी बसविला जावा. या अनेक मागण्या होत्या. या मागण्या गेल्या काही कालावधीमध्ये आपण फक्त दाखविण्यापुरत्या पूर्ण केल्या. मात्र त्याच्यातून लोकांना कुठल्याही प्रकारचा न्याय मिळाल्याचे चित्र कुठेही स्पष्ट झाले नाही. आता आपला हा ठेका देण्याचे जे आपल्या नजरेसमोर सभागृहासमोर आणलेले आहे त्यामध्ये हे सर्व नियम त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे. संबंधित ठेकेदाराला त्याबद्दल माहिती दिली पाहिजे. जी ॲग्रीमेंन्ट करु त्या ॲग्रीमेन्टमध्ये या सगळ्या अटीशर्ती त्याला घालून दिल्या पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

अटीशर्तीचे जे ॲग्रीमेन्ट केलेले आहे. ते आम्हांला दाखवा.

**मोहन पाटील :-**

सभापती महोयदय, विषय असा आहे. पहिले यांचे पत्र फेटाळले म्हणून सांगा ना. प्रश्न येत नाही. मग तो विषय संपतो. मग दुसरा विषय सुरु होईल.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेबांनी, जाहिर केले आहे.

**आसिफ शेख :-**

मा. सभापती साहेब, या ठिकाणी मा. आयुक्त साहेबांनी जो विषय विषयपटलावर प्रशासनाच्या माध्यमातून आणलेला आहे. आरशाप्रमाणे एकदम व्यवस्थित प्रस्ताव या ठिकाणी आहे. म्हणजे काही लपवाछपवी त्यामध्ये बिलकुल नाही आहे. १६ मे २००४ रोजी आपली ऑक्ट्रॉय ठेकेदाराची मुदत संपते आहे आणि तत्पुर्वी आपल्याला निविदा मागविणे आवश्यक होते. पण दरम्यानच्या काळात लोकसभेच्या निवडणुका असल्यामुळे आचारसंहिता लागू होती. त्यामुळे आयुक्त साहेबांनी कलेक्टरच्या मार्फत निवडणूक आयोगाकडे परवानगी मागितली की, आचारसंहिता लागू आहे त्यामुळे तुम्ही आम्हांला मार्गदर्शन करा आणि मा. निवडणूक आयोगाने १६/०४/२००४ रोजी नालेसफाई, जलवाहिन्या आणि खास बाब म्हणून ऑक्ट्रॉयसाठी निविदा काढण्याची मंजुरी आपल्याला दिलेली आहे आणि त्या अनुषंगाने आपण वृत्तपत्रात म्हणजे दै. सामना, दै. मुंबई सकाळ, दै. नवाकाळ, दै. सुरजप्रकाश साप्ताहिक, दै. इंडियन एक्सप्रेस या सगळ्या हिंदी, मराठी, गुजराथी दैनिक वृत्तपत्रात आपण निविदा दिल्या आणि त्यानुसार आपल्याकडे ऑक्ट्रॉयच्या विविध ठेकेदारांनी ठेका भरलेला आहे. विशेष बाब म्हणजे मागच्या वेळी २९ कोटीचा आपला जो ठेका होता आणि जी या वर्षाची देकार रक्कम ३५ कोटी ९८ लाख ७९ हजार ९९८ तर मागच्या वर्षापेक्षा यावर्षीची देकार रक्कम आपल्याला मिळाली आहे. ठेकेदाराने जो ठेका भरलेला आहे. तर आपल्याकडे दोन विचाराधीन आलेले आहेत. एक म्हणजे मेसर्स सहकार एजन्सी प्रा. लि. त्यांनी यावर्षी ३५ कोटीच्या दरम्यान भरलेले आहे आणि दुसरे म्हणजे कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी ३६ कोटी २७ लाखाचा ठेका भरलेला आहे. म्हणजे मागचे २९ कोटीपेक्षा यावेळी जे आहे आहे ते ३६ कोटी २७ लाख आलेले आहे. म्हणजे जवळजवळ सव्वा सात कोटीची जास्त रक्कम आपल्याला मिळालेली आहे. जास्त नफा महापालिकेला झालेला आहे. तर एक प्रकारे मला वाटते प्रशासनाच्या दृष्टीकोनातून ही फिलगुडची बाब आहे. कारण एवढे सव्वा सात कोटी रुपये आपल्याला विकास कामाला जास्त उपलब्ध होणार आहेत आणि असे असताना सुद्धा चित्र स्पष्ट आहे. त्यामुळे मला वाटते् कोणालाही हरकत किंवा शंका घेण्याचे कारण नाही. आता एक यामध्ये गोष्ट आहे की, पुढच्याला जर ठेच लागली तर मागचा शहाणा असे आपण म्हणतो त्याप्रमाणे आपल्याला मागच्या ठेकेदाराचा अनुभव आहे तर त्या ठेकेदाराबाबत ज्या नागरिकांच्या तक्रारी होत्या त्या अटीशर्तीमध्ये आपण त्या सुचना घ्या व ज्या काही सुचना, सजेशन आहे त्या स्विकारा आणि तुमच्या सुचना या स्वागतार्ह आहेत.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, आनंद वाटला फिलगुड. लपवाछपवी नाही आहे हे ऐकल्यावर आणखी आनंद वाटला. म्हणजे लपवाछपवी याच्या अगोदर होत होती असा अर्थ त्यांनी आमचे परममित्र सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी सागितले. त्यामुळे तुम्ही बोललात आनंद वाटला.

**आसिफ शेख :-**

आम्ही काय सांगितले लपवाछपवी नाही. पण ज्या तुमच्या मनात शंका आहेत. त्यांचे निरःसन आम्ही या ठिकाणी केले.

**शरद पाटील :-**

आमच्या मनात कसली शंका नाही. आम्ही कुठल्याही ऑक्ट्रॉयला विरोध करायला गेलो नव्हतो. आम्ही सांगितले होते हा प्रश्न महासभेपुढे जावा असे बोललो होतो. त्याची कारणे सांगतो की, स्थायी समितीमधून हा ठराव पास झाला. त्यावेळी त्यांना अक्कल नव्हती का? तर प्रत्येकजण अकलेप्रमाणे चालतो. कोणाची अक्कल जास्त चालते, कोणाची अक्कल कमी चालते हा वादाचा विषय आहे. याच्यावर आपल्याला बोलायचे नाही.

**आसिफ शेख :-**

या ठिकाणी आचारसंहिता महत्वाची होती. आचारसंहिता ही १३ तारखेपर्यंत लागू आहे. त्यामुळे अकलेचा वाद नाही.

**शरद पाटील :-**

महाराष्ट्राची आचारसंहिता संपलेली आहे असे पेपरला आहे होते.

**आसिफ शेख :-**

आचारसंहिता लागू असल्यामुळे मा. आयुक्त साहेबांना हा तातडीचा विषय या ठिकाणी आणायचा होता. त्यामुळे हा विषय आपल्याकडे आला आहे आणि तुमचे पत्र महासभेपुढे घेऊन जाण्यासाठी आपल्याला हाता वेळ नाहीच आहे. १३ तारखेपर्यन्त आचारसंहिता आहे.

**शरद पाटील :-**

ठिक आहे. ते पत्र फेटाळण्यांत आले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभा कोण चालवतो, तुम्ही चालवता की, सभापती महोदय चालवतात?

**शरद पाटील :-**

सभापती महोदयांनी ते पत्र फेटाळलेले आहे आणि इथेच विषय संपलेला आहे. पत्र फेटाळल्याबाबत बोलत नाही. पण मला यामध्ये एक शंका आहे ती विचारतो आहे की, आपण आता जी रक्कम वाढविली आहे. ती रक्कम माझ्या मते बजेटच्या वेळेला १५ टक्के वाढवणार म्हणून बोलले गेले होते. पण ती १० टक्के वाढविली आहे. ती प्रोसिडींग काढा. नियमाप्रमाणे १० टक्के आपण बोलत होतो. त्याच्यानंतर १५ टकके बोलले होते. मग १५ टक्के केले.

**मोहन पाटील :-**

सदर ठरावाचे सभागृहासमोर वाचन करुन ठराव मांडला.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटीलजी ह्यांनी मांडलेल्या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

यामध्ये सगळी चर्चा झाली. केळकर साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनियम प्रकरण २९ चे ४६६ नुसार कमिशनर साहेबांनी काही स्थायी आदेश द्यायचे असतात. आपण त्यांना स्टॅंडिंग ऑर्डर म्हणतो. त्या स्टॅंडिंग ऑर्डर या पद्धतीने दिल्या गेल्या आहेत का? कारण आता शेवटी सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी सांगितले त्या स्टॅंडिंग ऑर्डरमध्ये या सगळयांचा उल्लेख आहे की, करार करताना जे बंधनकारक असते ते म्हणजे त्या ऑर्डर या नियमानुसार दिल्या जाव्यात. म्हणजेच प्रकरण २९ चे ४६६ नुसार दिल्या आहेत का? ते बघा. कारण माझ्या माहितीनुसार ॲग्रीमेंट मी वाचलेले आहे. त्याच्यमध्ये या ऑर्डर दिलेल्या नाहीत असे मला वाटते. ह्याची जरा चौकशी करा. आता ही एवढी चर्चा झाली व मघाशी तुम्ही त्याचे विश्लेषण केले. पण त्याच्यात तुमचे सुद्धा काही कॉमेन्ट्स आलेले नाही. मघाशी यांनी जो मुद्दा काढला त्यामध्ये हा जो टी.डी.आर. ३ मार्च ९५ चा आहे. त्याच्यामध्ये पान क्र. ६ मध्ये हा जो परिच्छेद दिला आहे त्याच्यामध्ये अगदी क्लिअर कट दिले आहे की, पहिल्या वर्षीची जकात असेल त्याच्या मुळ रक्कमेपेक्षा १० टक्के वाढवत पुढच्या वर्षाला जायचे. म्हणजे ह्यांनी ऑब्जेक्टीव्ह मुद्दा उपस्थित केला की, तो जो निर्णय आहे तो किती वर्षाकरिता होता. ह्याच्यामध्ये अगदी क्लिअर वे आहे की, गव्हर्नमेंन्टच्या शासन निर्णयामध्ये एकदा जकातीचा निर्णय झाला की, त्याच्यामध्ये पुढे १०-१० टक्के वाढीव करत जायचे. मी एक कॉपी आणलेली आहे. ती तुम्ही तुमच्याकडे ठेवावी. माझा सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, सदस्यांनी जर ही कॉपी दिली असती तर हा वाद उत्पन्न झाला नसता. त्याच्यानंतर स्टॅंडिंग ऑर्डरचा हा जो विषय मी सांगितला त्याच्यामध्ये पुणे महानगरपालिकेच्या बाबतीमध्ये घ्या स्टॅंडिंग ऑर्डरच्या संदर्भात क्लिअर कट डायरेक्शन्य आहेत. ती घ्या आणि आपल्याकडे ती ठेवा. त्या ॲग्रीमेंटमध्ये जर काही स्टॅंडिंग ऑर्डरच्यामध्ये बदल करता आला. तर त्याचा उल्लेख साहेबांबरोबर चर्चा करताना हे घेऊन जा. त्याच्यामध्ये काय काय करता येईल ते बघा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुम्ही पण चर्चेला या.

**मिलन म्हात्रे :-**

येऊ. ती तयारी करून इकडे आलेलो आहे. पण त्यामध्ये चर्चा झाली नाही. पण या ठरावामध्ये दोन जी.आर. चा उल्लेख करावा म्हणजे परत परत मुद्दा उपस्थित होत नाही. शासनाच्या

जी. आर नुसार त्याच्यामध्ये अटी-शर्ती होत्या त्याचा शेवटी त्या ठरावामध्ये सुधार केला. ते नमुद करावे. म्हणजे जी काही इतर प्रॉब्लेम आहेत ते उद्‌भवणार नाहीत.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव उपसूचनासह स्विकारून मंजूर करण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

उपसूचना अटीशर्ती ह्यांची दुरूस्ती करून स्विकारण्यात येत आहे असे आले पाहिजे.

**प्रकरण क्र. २ :-**

सन २००४-०५ या आर्थिक वर्षासाठी जकात वसुलीकामी निविदा मंजूरी बाबत.

**ठराव क्र. २ :-**

मे. सहकार एजन्सी प्रा. लि. यांचा जकात वसुलीचा करार दि. १६ मे २००४ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे समयबद्ध कार्यवाही करणे आवश्यक आहे. दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाल्याने सन २००४-०५ या वर्षाकरिता जकात वसुलीकामी इच्छूक जकात अभिकर्त्यांकडून निविदा मागविण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/आयुक्त/१३८/१२७९४/२००३-०४, दि. २३/०३/२००४ अन्वये मा. मुख्य निवडणूक अधिकारी, मंत्रालय, मुंबई यांचेकडून मंजूरी माविण्यात आली होती.

मा. मुख्य निवडणूक अधिकारी यांचे पत्र क्र. सीईएल/२८०४/५३७९/३३, दि. १६/०४/२००४ अन्वये जकात वसुलीकामी निविदा मागविण्यास मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार राज्य शासनाचे नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र. जीईएम-१०९४/प्र.क्र.१४३/नवि-१४, दि. ०३/०३/९५ अन्वये सन २००४/०५ या आर्थिक वर्षासाठी जकात वसुलीची देकार रक्कम खालीलप्रमाणे निर्धारित केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| सन २००३-०४ च्या देकाराची रक्कम | - | २९,०७,९९,९९९/- |
| १० टक्के वाढीची रक्कम | - | २,९०,७९,९९९/- |
| एकूण रक्कम | - | ३१,९८,७९,९९८/- |
| ठराव क्र. ६१, दि. २५/०२/२००४ अन्वये ११ वस्तूंवर | | |
| जकातवाढ केल्यामुळे अंदाजीत वाढीव उत्पन्न | - | ४,००,००,०००/- |
| एकूण देकाराची अपेक्षित रक्कम | - | ३५,९८,७९,९९८/- |
| ५ टक्के इसारा रक्कम | - | १,८०,००,०००/- |
| १६ टक्के सुरक्षा अनामत | - | ५,७६,००,०००/- |

जकात वसुली कामी जकात अभिकर्त्याच्या नियुक्तीसाठी जाहिर निविदा दि. १८/०४/२००४ रोजीच्या दै. सामना, दै. मुंबई सकाळ, दै. नवभारत (हिंदी), दै. सुरजप्रकाश, दै. इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी) या वृत्तपत्रात निविदा प्रसिद्ध करण्यांत आलेल्या होत्या. त्यानुसार दि. ३०/०४/२००४ पर्यंत खाली इच्छूकांनी निविदा प्रपत्र रक्कम रु. १५००/- महापालिका निधीत भरणा करुन स्विकारले होते.

१) मे. कोणार्क इन्फ्रार्स्टक्चर प्रा.लि.
२) मे. मेघना इंटरप्राईसेस
३) मे. श्री. जी. कॉर्पोरेशन
४) मे. बालाजी सर्व्हीसेस
५) मे. शिवा वाईन्स ॲण्ड टोल
६) मे. सहकार एजन्सी प्रा.लि.

त्यापैकी तिघा इच्छूक निविदाधारकांनी दि. ३०/०४/२००४ दु. ४.०० वाजेपर्यंत सिलबंद लखोट्यात निविदा सादर केल्या होत्या. त्यापैकी २ निविदाधारकांनी निविदेसोबत इसारा रक्कम रु. १,८०,००,०००/- महापालिकाचे नांवे डिमांडड्राफ्ट जमा केले आहेत. मे. मेघना इन्टरप्रायझेस यांनी इसारा रक्कमेचा धनाकर्ष जमा केलेला नाही.

१) मे. कोणार्क इन्फ्रार्स्टक्चर प्रा.लि.
२) मे. सहकार एजन्सी प्रा.लि.
३) मे. मेघना इंटरप्राईसेस

उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदांपैकी दोन निविदाधारकांनी अटीशर्तीचे पालन केले असल्याने दि. ३०/०४/२००४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता निविदा उघडण्यांत आल्या. त्यांनी निविदेत नमूद केलेली देकार रक्कम पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | निविदेत नमूद केलेली देकार रक्कम |
|---|---|---|
| १ | मे. सहकार एजन्सी प्रा.लि. | रु. ३५,०१,९९,९९९.९९/- |
| २ | मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रु. ३६,२७,००,०००/- |
| | तसेच मे. मेघना इन्टरप्रायझेस यांनी अटीशर्तीचे पालन न करता इसारा रक्कमेचा धनाकर्ष निविदेसोबत जोडला नसल्याने निविदा स्विकृत केली नाही. | |

मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी निविदा रक्कम रु. ३६,२७,००,०००/- जादा देकार रक्कमेची आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कलम ३५ अन्वये सन २००४-०५ या आर्थिक वर्षासाठी जादा देकार रक्कमेची निविदा स्विकारुन त्याचे बरोबर योग्य त्या अटीशर्तीसह करारनामे करावे त्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म. पाटील. अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम ह्यांच्या मातोश्रीचे निधन झाले याबाबत सभागृहात दोन मिनिटे शांतता पाळावी.

**दुःखवटा ठराव क्र. ३ :-**

सन्मा. सदस्या श्रीम. रिटा शहा यांच्या मातोश्री कै. श्रीम. वसंतबेन मगनलाल आचार्य ह्यांचे दि. ०२/०५/२००४ रोजी निधन झाले. त्यांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दुःखात ही सभा सहभागी असून मृतात्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती. अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**दुःखवटा ठराव क्र. ४ :-**

मा. महापौर यांच्या सासूबाई व सन्मा. नगरसेवक श्री. स्टीवन जॉन मेन्डोंसा यांच्या मातोश्री कै. तेरेझा जॉन मेन्डोन्सा यांना दि. ११/०४/२००४ रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दुःखात ही सभा सहभागी असून, मृतात्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुचक :- श्री. आसिफ शेख. अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे व सर्वांना होळीच्या हार्दीक शुभेच्छा.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.०५ मि.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**